पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ४३ /२०२४ दि. १४/०३/२०२४

## —: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **नौपाडा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत डॉ. मूस रोड वरील राजावत ज्वेलर्स व ग्रीन लीफ हॉटेलसमोर जुनी व नवीन मलवाहिनीचे क्रॉस कनेक्शन करण्यासाठी ६ मीटर लांब, १.५ मीटर रूंद व ३ मीटर खोल खोदकाम करून नवीन ड्रेनेज पाईप टाकून सदर भागातील ड्रेनेज सुविधा सुरळीत करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :—

**प्रवेश बंद –** वंदना बस स्टॅण्ड, गजानन महाराज चौक येथून पु. ना. गाडगीळ ग्रीन लीफ मार्गे ठाणे स्टेशन कडे जाणा–या बसेस, सर्व प्रकारची माल वाहतूक व जड अवजड वाहनांना **गजानन महाराज चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गजानन महाराज चौक कडून उजवे वळण घेवून तीन पेट्रोल पंप, आराधना हरिनिवास सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. १४/०३/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वा. ते दि. २३/०३/२०२४ रोजी रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत :–** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :–** सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे त्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत